सुधारणा व पुनर्वसन
दुरध्वनी क्र. ०२० २६६१२६६३
ई-मेल-yerwadacp-mh@gov.in

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
अधीक्षक,
येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे.

दि.०८.०१.२०२५.

## प्रेस नोट

कर्नल क्युब फाऊंडेशन, पुणे या सेवाभावी संस्थेमार्फत सामाजिक बांधिलकी जपत येरवडा मध्यवर्ती कारागृह व येरवडा महिला कारागृहातील बंद्यांसाठी वयोवृध्द् माणसाचे आजारपणात कशी काळजी घ्यावी, याबाबत **"बेड साईड केअर गिव्हर्स"** हा २० दिवसांचा प्रशिक्षण व मार्गदशन उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रम व प्रशिक्षण शिबिरात **एकुण १२० पुरुष व महिला** बंद्यांनी सहभाग नोंदवला आहे. त्यातील पहिल्या टप्यात **२० पुरुष व १३ महिला** बंद्यांनी यशस्वी प्रशिक्षण पुर्ण केले आहे. त्यानुसार सदर बंद्यांना आज दि.०८.०१.२०२५ रोजी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. सदर प्रशिक्षणाचा फायदा कारागृहातील वयोवृध्द् बंद्यांच्या आजारपणात काळजी घेण्यासाठी निश्चितपणे होईल.

सदर उपक्रम मा. प्रशांत बुरडे (भा.पो.से) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. डॉ. जालिंदर सुपेकर (भा.पो.से) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे संकल्पनेतुन व मा. श्रीमती. स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

सदर उपक्रमाचे यशस्वी नियोजनासाठी श्री. सुनिल ढमाळ, अधीक्षक, श्रीमती. पल्लवी कदम, अति. अधीक्षक, श्री. आर ई गायकवाड, उपअधीक्षक, श्री. ए एस कांदे, वरीष्ठ तुरुंगाधिकारी, श्री. अंगद गव्हाणे, शिक्षक, श्रीमती ऋत्नाक्षी गवळी, शिक्षक संबंधीत संस्थेचे प्रतिनिधी श्री. कर्नल फुले, श्री. अनिरुध्द् देशमुख, श्री. शेखर नवाथे, श्री. सुनिल मोरे, श्री. नरेंद्र डांगी, श्रीमती. सावन पोंक्षे, श्रीमती. कमलिनी कानेटकर, श्रीमती. विनिता फुले, श्रीमती. स्मिता गोखले, श्रीमती. स्निग्धा देशमुख वश्रीमती. साधना डांगी यांनी कामकाज पाहीले.




येरवडा मध्यवर्ती
पुणे